## उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांचे कार्यालय

राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी (भवन) एम.बी.एम.सी.बिल्डींग

शांती गार्डन, रामनगर, मिरारोड (पुर्व) ४०११०७.

☎ २८४५४३६१


# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश


जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, ठाणे.
६९७६
11 .06 2017


जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-५/डेव्हिड पॅलेस को.ऑप.
ही/कलम ८८/ ७९२२ /सन २०१७.
दिनांक :- २९/०७/२०१७

वाचले :- १) डेव्हिड पॅलेस को - ऑप. हौसिंग सोसायटी लि.सागर कॉम्प्लेक्स, सागर पॅलेस च्या मागे मिरारोड (पुर्व) या संस्थेचे दि. ०३/०६/२०१६ रोजी प्राप्त झालेले पत्र

२) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें दिनांक ०२/०१/२०१७ रोजीचे आदेश.

३) श्री विनायक रामचंद्र साखरे, विभागीय सहनिबंधक, सह. संस्था (ले.प.) (सेवानिवृत्त) तथा चौकशी अधिकारी यांनी कलम ८३ अन्वये त्यांचेकडील दि. ०३/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास दि. १२/०६/२०१७ सादर केलेला चौकशी अहवाल.

४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

---

ज्याअर्थी, डेव्हिड पॅलेस को - ऑप. हौसिंग सोसायटी लि.सागर कॉम्प्लेक्स, सागर पॅलेस च्या मागे मिरारोड (पुर्व) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९ अन्वये नोदणीकृत गृहनिर्माण संस्था असून सदर संस्था या कार्यालयाचे कार्यकक्षेत कार्यरत आहे, आणि,

ज्याअर्थी, डेव्हिड पॅलेस को - ऑप. हौसिंग सोसायटी लि.सागर कॉम्प्लेक्स, सागर पॅलेस च्या मागे मिरारोड (पुर्व)या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी या कार्यालयास संदर्भ क्र. १ अन्वये पत्र देऊन मागील ३ वर्षापासून श्री. एकनाथ सोनावळे हे प्रशासक म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यांनी कमिटी सभासदांना विचारात न घेता मनमानी पध्दतीने स्वत:च्या नावे ललित शहा, वॉचमनचा पगार , झाडुवाला पगार, लाईट बिल, पाणी बिल,शानु इंटरप्राईजस् व इतर खर्च जवळ जवळ रु. १०, ८५,८७७/- इतका केला आहे. आणि,

ज्याअर्थी, प्रशासक श्री. एकनाथ सोनावळे यांनी उपरोक्त प्रमाणे नमूद केलेल्या बाबींचा अपहार केल्याचे संस्थेच्या पदाधिका-यांनी केलेल्या तक्रारीनुसार सखोल चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून श्री विनायक रामचंद्र साखरे, विभागीय सहनिबंधक, सह. संस्था (ले.प.) (सेवानिवृत्त) यांची उक्त वाचावे क्र. २ अन्वयें या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दिनांक ०२/०१/२०१७ रोजीचे आदेशान्वये नियुक्ती केलेली होती. आणि,

ज्याअर्थी, सदर बाबत उक्त वाचावे क्र. ४ अन्वयें श्री विनायक रामचंद्र साखरे, विभागीय सहनिबंधक, सह. संस्था (ले.प.) (सेवानिवृत्त) यांनी दिनांक १२/०६/२०१७ रोजी या कार्यालयास चौकशी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये श्री. एकनाथ सोनावळ हे एकंदर १ ते ७ व्यवहारास एकंदरीत रु. ६,३२,५२५/- रुपयास जबाबदार आहेत व याबाबत सखोल चौकशी होणे आवश्यक असुन कमल ८८ अन्वयें जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडील अहवालात सुचविल्याप्रमाणे संबंधित मुद्यांवर चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत

Scanned by CamScanner

My Computer/D/PRITI/Act 88

चौकशी अधिकारी नियूक्त करणे आवश्यक आहे, असे ...

आदेश देत आहे.

# -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, दिनेश चंदेल, उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे असा आदेश देत आहे की, डेव्हिड पॅलेस को - ऑप. हौसिंग सोसायटी लि.सागर कॉम्प्लेक्स, सागर पॅलेस च्या मागे मिरारोड (पू)या संस्थेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करण्यासाठी परिशिष्ट अ प्रमाणे श्री बी. आर. मगदुम, सेवा निवृत्त, सहाय्यक निबंधक यांची कलम ८८ खाली प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

त्यांनी चौकशी करुन तीन महिन्यांचे आंत चौकशी अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश माझे आज दिनांक२८/०७/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह देत आहे.

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे

ठिकाण :- ठाणे
दिनांक :-२८/०७/२०१७

प्रति,

१) श्री बी. आर. मगदुम, सेवा निवृत्त, सहाय्यक निबंधक तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी, डेव्हिड पॅलेस को - ऑप. हौसिंग सोसायटी लि.सागर कॉम्प्लेक्स, सागर पॅलेस च्या मागे मिरारोड (पू)

२) चेअरमन /सेक्रेटरी,
डेव्हिड पॅलेस को - ऑप. हौसिंग सोसायटी लि.सागर कॉम्प्लेक्स, सागर पॅलेस च्या मागे मिरारोड (पू)

२/- त्यांना सूचित करण्यांत येते की, चौकशी कामी संस्थेचे संपूर्ण दप्तर व आवश्यक सर्व रेकॉर्ड प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावे. अन्यथा चौकशी कामी दप्तर प्राप्त करणेसाठी कलम ८० अन्वये कार्यवाही करणेत येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

तसेच चौकशी कामी रुपये १५,०००/- चौकशी शुल्कचा धनादेश मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे याचे खाती १५ दिवसांत जमा करावा. चौकशी शुल्क मुदतीत जमा न केल्यास सदर रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करणेचा अधिकार निबंधकास आहे, याची ही संस्थेने नोंद घ्यावी.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई.

२) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे.

उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.

Scanned by CamScanner